**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.**

फोन नं. ०२०/२६०५१५१२ Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

क्र. विधी- ३८२२/प्र.क्र. ५० /सीईटीसेल/ २२६ दिनांक : ०९ जानेवारी, २०२३

**परिपत्रक -**

**विषय : केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे विधी ३ आणि ५ वर्षीय अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता पहिल्या वर्षानंतर संस्था / महाविद्यालय बदल करण्याबाबत.**

वाचा : १. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८
२. शासन अधिसूचना क्र. टीईएम - २०१९/प्र.क्र.४१/तांशि-४, दि. ०४.०६.२०१९
३. शासन अधिसूचना क्र. सीईटी-२०१५/प्र.क्र.२४३(भाग-२)/मशि-२, दि.५.५.२०१७
४. शासन निर्णय क्र. सीईटी-२०१७/प्र.क्र.१२४/मशि-२, दिनांक १२.०५.२०१७.
५. शासन निर्णय क्र. विधी-२०१९/प्र.क्र.१३०/मशि-२, दिनांक ०९.१०.२०२०.
६. संचालनालयाचे परिपत्रक क्र. विधी- ३८२२/प्र.क्र. ५० /सीईटीसेल/१२०५३, दिनांक २८.०९.२०२२
७. संचालनालयाचे परिपत्रक क्र. विधी- ३८२२/प्र.क्र. ५० /सीईटीसेल/१४४६८, दिनांक १२.१२.२०२२

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संचालनालयाचे परिपत्रक दिनांक २८.०९.२०२२ अन्वये महाविद्यालय बदल करणेकरिता संचालनालय स्तरावर प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन, महाविद्यालय बदल करणेसाठी पात्र / अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांची यादी दिनांक १७.१०.२०२२ रोजी प्रसिध्द केलेली आहे.

२. तद्नंतर, काही विद्यार्थ्यांनी / महाविद्यालयांनी संचालनालयाकडे ईमेलद्वारे/ दूरध्वनीद्वारे विद्यापीठ निकालाबाबतच्या अडचणी नमूद करुन अंतिम संधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली होती. त्यास अनुसरुन संचालनालयाचे दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये विशेष बाब म्हणून महाविद्यालय बदल करणेसाठी अंतिम संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यानंतरदेखील काही विद्यार्थ्यांना निकालाची प्रत उपलब्ध न झाल्यामुळे अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात येत आहे. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

३. **ज्या विद्यार्थ्यांना दिनांक २८.०९.२०२२ रोजीच्या परिपत्रकानूसार शै. वर्ष २०२२-२३ मध्ये महाविद्यालय बदल करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे, असे विद्यार्थी वगळून उर्वरित विद्यार्थ्यांना याद्वारे महाविद्यालय बदल करण्यासाठीचा अर्ज करण्याकरिता संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या परिपत्रकानूसार अर्ज केलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.**

४. संचालनालयाचे परिपत्रक दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये अर्ज सादर केलेले विद्यार्थी व सदरहू परिपत्रकान्वये अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांपैकी महाविद्यालय बदल करणेसाठी

पात्र / अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांची नावे संचालनालयाद्वारे दिनांक १२.०१.२०२३ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत सर्व विधी महाविद्यालयांना ईमेलद्वारे अवगत करण्यात येतील. सदरहू यादी महाविद्यालयांनी सूचना फलकावर प्रदर्शित करावी.

५. **महाविद्यालय बदल करणेकरिता संचालनालयाचे परिपत्रक दिनांक २८.०९.२०२२ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांनूसार कार्यवाही करण्यात यावी.** तसेच सोबतच्या तक्त्यात नमूद केलेल्या कालमर्यादेचे पालन करण्यात यावे.

शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे

(डॉ. शैलेन्द्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रति

१. प्राचार्य, सर्व विधी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेलसिअर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.**

Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

---

**<u>पहिल्या वर्षानंतर संस्था / महाविद्यालय बदलासाठी वेळापत्रक</u>**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांना ज्या महाविद्यालयामध्ये बदलीने प्रवेश घ्यायचा आहे त्या ठिकाणी सहपत्रांसह (मूळ ना-हरकत प्रमाणपत्र, गुणपत्रिका इ.) प्रत्यक्ष अर्ज सादर करणे. | दिनांक ०९/०१/२०२३ ते दिनांक १०/०१/२०२३ |
| २ | महाविद्यालयांनी त्यांच्याकडे प्राप्त अर्जाची तपासणी करुन यादी, विद्यार्थ्यांचे अर्ज सहपत्रांसह संचालनालयास **हस्तपोच** करणे.<br>(ईमेलद्वारे प्राप्त अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.) | दिनांक ११/०१/२०२३ रोजी दुपारी २.०० पर्यंत |
| ३ | संचालनालय स्तरावर महाविद्यालय बदलण्यासाठी आलेल्या प्रस्तावाची पडताळणी. | दिनांक १२/०१/२०२३ |
| ४ | महाविद्यालय बदलण्यासाठी संचालनालय स्तरावरुन परवानगी देण्यात आलेल्या व परवानगी नाकारलेल्या विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयाला कळविणे. | दिनांक १२/०१/२०२३ सायं ५.०० पर्यंत. |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज सहपत्रांसह, महाविद्यालयाची शिफारस व Annexure B & C मधील माहिती संचालनालयास दिनांक ०९.०१.२०२३ ते ११.०१.२०२३ या कालावधीत हस्तपोच करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत सदरहू प्रस्ताव दिनांक ११/०१/२०२३ रोजी दुपारी ०२ वाजेपर्यंत / पूर्वी पोहोच होईल याबाबत खबरदारी घेण्यात यावी. दिनांक ११/०१/२०२३ नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

******

शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे सत्यमेव जयते

D:\Sandip\LAW\२०२२-२३\C.R.No. ५०-२२ विधी महाविद्यालय बदल.docx